## कार्यशाळा

# विषय : नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड

## दि. १९ जानेवारी २०२०

स्थानिक स्व.. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, समान संधी केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'नात्यातील सुरेल सवांदासाठी जोडीदाराची विवेकी निवड ' या विषयावर एकदिवसीय संवाद कार्यशाळा संपन्न झाली .

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. काशीनाथ ब-हाटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यशाळेचे उद्‌घाटन समर्थ शिक्षणशास्त्र संस्थेचे सचिव मा . श्रीपादजी तारे यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी कार्यशाळेचे बीजभाषक डॉ . भगवान फाळके , प्रमुख वक्ते डॉ . माधुरी झाडे, डॉ. हरीश पेटकर , रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेंद्र हाडोळे, डॉ . सौ . जयश्री कुळकर्णी, समान संधी केंद्राचे समन्वयक डॉ. नरेंद्र पाखरे,भूगोल विभाग प्रमुख डॉ. प्रमोद बावणे, डॉ. रवींद्र सावरकर, माजी विद्यार्थी सचिव श्रीकांत उमक, कार्यकारिणी सदस्य चेतन कानेकर उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वुमेन्स स्डडीज संटरचे सहायक प्राध्यापक डॉ. भगवान फाळके यांनी आपल्या बीजभाषणामधून सूत्रबद्ध मांडणी करीत असताना स्त्री - पुरूष ही या निसर्गाची समान अपत्य असून स्वभावतः त्यांच्यामध्ये समानता आहे. सहजीवनातील सुरेल संवादासाठी आपण एकमेकांचा सन्मान केला पाहिजे, एकमेकांच्या मतांचा, भावनांचा आणि विचारांचा आदर केला पाहिजे असे मत मांडले.

आपल्या उद्‌घाटनपर मनोगतातून संस्थेचे सचिव श्रीपाद तारे यांनी जोडीदाराची निवड करताना आपण अनावश्यक अपेक्षा न ठेवता आपल्या विचारांशी सवांदी असणाऱ्या साथीदाराची निवड केली पाहिजे.नात्यांमधील संशय आणि अहंभावामुळेच अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

नात्यातील सुरेल सवांदासाठी जोडीदाराची विवेकी निवड या विषयावरील संवाद कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक , महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती वर्धा जिल्ह्याच्या प्रधान सचिव डॉ. माधुरी झाडे आणि चिखलदरा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ . हरीश पेटकर यांनी सलग दोन सत्रांमध्ये दृकश्राव्य माध्यमाच्या द्वारे आपल्या सहजीवनातील जोडीदाराची निवड करताना कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ते अतिशय रंजक आणि मार्मीक उद्‌बोधनाद्वारे विद्यार्थांना पटवून दिली. जोडीदाराची निवडीसाठी आपण आपला विवेक नेहमीसाठी जागृत ठेवला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. आपल्या मनातून आपण सर्वप्रथम लिंगभेदभावात्मक भावना काढून टाकली पाहिजे असेही त्यांनी सांगितले .

कार्यशाळेच्या समारोपीय सत्रात कु.वैष्णवी भाकरे आणि प्रशांत आठवले यांनी आपली उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केली .

उत्साहवर्धक वातावरणात दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेचे बहारदार सूत्रसंचालन डॉ. सुरेंद्र हाडोळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. नरेंद्र पाखरे यांनी केले.

कार्यवाह (signature)

Off. Principal
Late Chhaganlal Muljibhai Kadhi
Kala Mahavidyalaya,Achalpur Camp

## नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड कार्यशाळेची काही क्षणचित्रे






















सकाळ

# एकमेकांच्या भावनांचा आदर करावा

## डॉ. फाळके : 'जोडीदाराची विवेकी निवड'वर कार्यशाळा

**परतवाडा, ता. ४ :** स्त्री-पुरुष ही या निसर्गाची समान अपत्य असून स्वभावतः त्यांच्यामध्ये समानता आहे. सहजीवनातील सुरेल संवादासाठी आपण एकमेकांचा सन्मान केला पाहिजे, एकमेकांच्या मतांचा, भावनांचा आणि विचारांचा आदर केला पाहिजे असे मत डॉ. भगवान फाळके यांनी मांडले.

स्थानिक स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, समान संधी केंद्राच्या संयुक्त विद्यमाने नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड, या विषयावर संवाद कार्यशाळा झाली. या वेळी ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. काशिनाथ बऱ्हाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यशाळेचे उद्घाटन समर्थ शिक्षणशास्त्र संस्थेचे सचिव श्रीपाद तारे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी कार्यशाळेचे बीजभाषक डॉ. भगवान फाळके, प्रमुख वक्ते डॉ. माधुरी झाडे, डॉ. हरीश पेटकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेंद्र हाडोळे, डॉ. जयश्री कुळकर्णी, डॉ. नरेंद्र पाखरे, डॉ. प्रमोद बावणे, डॉ. रवींद्र सावरकर, श्रीकांत उमक, चेतन कानेकर उपस्थित होते.




**परतवाडा : उपस्थितांना मार्गदर्शन करताना मान्यवर.**

संस्थेचे सचिव श्रीपाद तारे यांनी जोडीदाराची निवड करताना आपण अनावश्यक अपेक्षा न ठेवता आपल्या विचारांशी संवादी असणाऱ्या साथीदाराची निवड केली पाहिजे. नात्यांमधील संशय आणि अहंभावामुळेच अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला डॉ. माधुरी झाडे, डॉ. हरीश पेटकर, वैष्णवी भाकरे, प्रशांत आठवले उपस्थित होते. संचालन डॉ. सुरेंद्र हाडोळे यांनी केले. आभार डॉ. नरेंद्र पाखरे यांनी मानले.

Nagpur, Amravati-Today
05/02/2020 Page No. 2

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

॥ श्रीकृष्णम् वंदे जगद्गुरूम् ॥

# अध्ययन समाचार

आता रोज रहा..अपडेट!

संपादक : जितेंद्र रोडे

e EDITION

कार्यालय : मदन महल, जयस्तंभ चौक, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती (महाराष्ट्र) 444805

भ्रमणध्वनी : 9422158005 दूरध्वनी : 07223-222005

jitendrarode77@gmail.com

Adhayayn Samachar

दि. २१ जानेवारी २०२०

## स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालयात

## नात्यातील सुरेल संवादासाठी जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर कार्यशाळा

**परतवाडा दि. २१ प्रतिनिधी** स्थानिक स्व.. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, समान संधी केंद्राच्या संयुक्त विद्यमाने नात्यातील सुरेल सवांदासाठी जोडीदाराची विवेकी निवड या विषयावर एकदिवसीय संवाद कार्यशाळा संपन्न झाली .



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. काशीनाथ ब-हाटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यशाळेचे उद्घाटन समर्थ शिक्षणशास्त्र संस्थेचे सचिव मा . श्रीपादजी तारे यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी कार्यशाळेचे बीजभाषक डॉ . भगवान फाळके , प्रमुख वक्ते डॉ . माधुरी झाडे, डॉ. हरीश पेटकर , रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेंद्र हाडोळे, डॉ . सौ . जयश्री कुळकर्णी, समान संधी केंद्राचे समन्वयक डॉ. नरेंद्र पाखरे, भूगोल विभाग प्रमुख डॉ. प्रमोद बावणे, डॉ. रवींद्र सावरकर, माजी विद्यार्थी सचिव श्रीकांत उमक, कार्यकारिणी सदस्य चेतन कानेकर उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वुमेन्स स्टडीज संटरचे सहायक प्राध्यापक डॉ. भगवान फाळके यांनी आपल्या बीजभाषणामधून सूत्रबद्ध मांडणी करीत असताना स्त्री - पुरूष ही या निसर्गाची समान अपत्य असून स्वभावत: त्यांच्यामध्ये समानता आहे. सहजीवनातील सुरेल संवादासाठी आपण एकमेकांचा सन्मान केला पाहिजे, एकमेकांच्या मतांचा, भावनांचा आणि विचारांचा आदर केला पाहिजे असे मत मांडले.

आपल्या उद्घाटनपर मनोगतातून संस्थेचे सचिव श्रीपाद तारे यांनी जोडीदाराची निवड करताना आपण अनावश्यक अपेक्षा न ठेवता आपल्या विचारांशी सवांदी असणाऱ्या साथीदाराची निवड केली पाहिजे.नात्यांमधील संशय आणि अहंभावामुळेच अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

नात्यातील सुरेल सवांदासाठी जोडीदाराची विवेकी निवड या विषयावरील संवाद कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक , महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती वर्धा जिल्ह्याच्या प्रधान सचिव डॉ. माधुरी झाडे आणि चिखलदरा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ . हरीश पेटकर यांनी सलग दोन सत्रांमध्ये दृकश्राव्य माध्यमाच्या द्वारे आपल्या सहजीवनातील जोडीदाराची निवड करताना कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ते अतिशय रंजक आणि मार्मीक उद्बोधनाद्वारे विद्यार्थांना पटवून दिली. जोडीदाराची निवडीसाठी आपण आपला विवेक नेहमीसाठी जागृत ठेवला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. आपल्या मनातून आपण सर्वप्रथम लिंगभेदभावात्मक भावना काढून टाकली पाहिजे असेही त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या समारोपीय सत्रात कु. वैष्णवी भाकरे आणि प्रशांत आठवले यांनी आपली उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केली .

उत्साहवर्धक वातावरणात दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेचे बहारदार सूत्रसंचालन डॉ. सुरेंद्र हाडोळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. नरेंद्र पाखरे यांनी केले.

Hero

दुनिया का भरोसा....इंडिया की शान



श्री साईनाथ हिरो

अमरावती रोड, परतवाडा | सेल्स : 9607909839 सर्व्हीस : 8080409759